# संपादकीय

## विकासाचा वेग अन् महागाईचा आगडोंब

जागतिक स्तरावरील भू-राजकीय संघर्ष, बदलते हवामान आणि पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे यांमुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था अभूतपूर्व संकटातून जात आहे. या पार्श्वभूमीवर, भारतासारख्या उदयोमुख महासत्तेसमोर विकासाची गती कायम राखणे आणि त्याच वेळी देशांतर्गत किंमतींवर नियंत्रण मिळवणे, हे एक मोठे आव्हान बनले आहे. एका बाजूला जीडीपी वृद्धीच्या दरात होणारी सकारात्मक वाढ आणि डिजिटल व पायाभूत सुविधांमधील प्रगतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड वेगाने सुरू आहे; तर दुसर्या बाजूला सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई दर ५.५४ टक्क्यांवर पोहोचला असून, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार घाऊक किंमत निर्देशांक महागाई ऑगस्टच्या ९.९२ टक्क्यांवरून वाढून सप्टेंबरमध्ये थेट ११.३९ टक्क्यांवर झेपावली आहे. हा महागाईचा आगडोंब सर्वसामान्य जनतेच्या संसाराची घडी पूर्णपणे विस्कटत आहे. जागतिक मंदीचे सावट असतानाही भारताने जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान टिकवून ठेवले आहे. देशांतर्गत उत्पादन क्षेत्र, महामार्ग निर्मिती, रेल्वेचे जाळे, डिजिटल ट्रान्झॅक्शन आणि नवनवीन तंत्रज्ञानातील गुंतवणूक यामुळे देशाची आर्थिक घोडदौड वेगाने होत आहे. मात्र, वाढत्या महागाईचे ग्रहण या प्रगतीवर सावट पाडत आहे. कागदावर देशाचा विकास दिसत असला, तरी बाजारात भाजीपाला, अन्नधान्य, औषधे आणि रोजच्या वापराच्या वस्तूंच्या वाढलेल्या किंमतींमुळे सामान्य माणूस त्रस्त झाला आहे. किरकोळ महागाईचा दर थेट ग्राहकांच्या खिशाशी निगडित असतो. अन्नधान्य, दुग्धजन्य पदार्थ, डाळी आणि इंधनाचे दर उच्चांकावर जातात, तेव्हा मध्यमवर्ग आणि गरिबांचे बजेट पूर्णपणे कोलमडून पडते. घाऊक महागाईचा वाढता आलेख उद्योग जगत आणि उत्पादकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. सप्टेंबरमध्ये प्राथमिक वस्तूंची महागाई ७.६७ टक्क्यांवर गेली, तर घाऊक अन्न निर्देशांकाने ६.६६ टक्के इतका वार्षिक महागाई दर नोंदवला. विशेषतः, इंधन आणि ऊर्जा या विभागाने सप्टेंबरमध्ये २५.८५ टक्केइतका सर्वाधिक वार्षिक महागाई दर नोंदवला, जो ऑगस्टमध्ये २२.९३ टक्के होता. कच्चा माल आणि ऊर्जेच्या किंमती वाढल्यामुळे उत्पादनांचा खर्च वाढतो, ज्याचा थेट परिणाम अंतिम उत्पादनाच्या किंमतीवर होतो. घाऊक बाजारात महागाई वाढते, तेव्हा लघु व मध्यम उद्योगांचे नफ्याचे मार्जिन कमी होते, ज्यामुळे रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेतही अडथळे निर्माण होतात. या समस्येचे मूळ केवळ देशांतर्गत कारणांमध्ये नाही, तर जागतिक घडामोडींमध्येही दडलेले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किंमतीतील अस्थिरता, युद्धांमुळे विस्कटलेली सागरी वाहतूक आणि एल निनोमुळे घटलेला पाऊस व शेती उत्पादनांना बसलेला फटका यामुळे पुरवठा साखळी खंडित झाली आहे. भारतात मान्सूनच्या लहरीपणाचा किंवा अवकाळी पावसाचा शेतीवर होणारा परिणाम आणि राज्यातील ८० टक्के भागात जाहीर झालेला दुष्काळ यामुळे अन्नधान्याच्या किंमती अनियंत्रित झाल्या आहेत. अर्थव्यवस्थेची घोडदौड आणि महागाईचे संकट यांच्यातील हा विरोधाभास दूर करण्यासाठी सर्वसमावेशक आणि धोरणात्मक उपायांची गरज आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व्याजदरांचे नियंत्रण करून चलनवाढ रोखण्यासाठी सतत प्रयत्न केले असले, तरी केवळ पतधोरणावर अवलंबून चालणार नाही. व्यापारी व दलालांकडून होणारी साठवणूक रोखण्यासाठी डोळ्यात तेल घालून लक्ष देणे गरजेचे असून, साठवणुकीवर मर्यादा आणून प्रसंगी थेट बाजारात हस्तक्षेप करून किंमती नियंत्रित ठेवाव्या लागतील. दुष्काळग्रस्त शेतकर्यांना आर्थिक मदत, रोजगाराच्या संधी आणि ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. भारताची आर्थिक घोडदौड ही देशाच्या उज्ज्वल भविष्याची नक्कीच साक्ष देते; परंतु जर सर्वसामान्य नागरिक या विकासाच्या ओझ्याखालीच दबला गेला, तर त्या प्रगतीला अर्थ उरणार नाही.महागाईच्या वणव्याला नियंत्रणात आणणे, हे सरकार आणि धोरणकर्त्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. जोपर्यंत सामान्य माणसाची ताटली सुरक्षित होत नाही आणि बाजारातील दर नियंत्रणात येत नाहीत, तोपर्यंत खरी आर्थिक समृद्धी साधली गेली असे म्हणता येणार नाही. यासाठी ठोस, दूरगामी आणि प्रभावी पावलांची तातडीची आवश्यकता आहे.

# समान काम समान वेतनच्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचार्यांचे आंदोलन



**शहादा । ता. प्र.**

समान काम समान वेतन मागणीसाठी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कर्मचार्यांनी शासन दरबारी आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आज सकाळी ९.४५ च्या सुमारास न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर कळया फित लावून आंदोलन केले. हे आंदोलन १६ व १७ ऑक्टोबर असे दोन दिवस काळी फित लावून न्यायालयीन कामकाज करणार आहेत. तरीही शासनाने निर्णय न घेतल्यास १६ नोव्हेंबर पासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा न्यायालयीन कर्मचार्यांनी दिला आहे. न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून काम करणार्या दुय्यम न्यायालयीन कर्मचार्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न तब्बल २० वर्षांपासून प्रलंबित आहे. वर्षानुवर्षे शिस्तीने आणि प्रामाणिकपणे काम करूनही वेतनवाढीच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने वेतनवाढीबाबत तातडीने निर्णय न झाल्यास १६ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप करण्याचा इशारा यापूर्वीच महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे. दरम्यान, ३१ जानेवारी २०२५ रोजी उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयीन कर्मचार्यांच्या वेतनवाढीबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत राज्य सरकारकडे पाठविला आहे. मात्र, त्यानंतर १८ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटूनही शासनाने यावर निर्णय घेतलेला नसल्याने कर्मचार्यांमध्ये नाराजी आहे या पार्श्वभूमीवर महासंघाची बैठक झाली. बैठकीत आंदोलनाची टप्पाटप्याने रूपरेषा निश्चित करण्यात आली. त्यानुसार यापूर्वी १६ सप्टेंबरला एक दिवस काळ्या फिती लावून निषेध करण्यात आला होता.

# नरव्हाळ येथे बालिकेचा लैंगिक छळ; तिघांवर गुन्हा दाखल

**धुळे । प्रतिनिधी ।** तालुक्यातील नरव्हाळ येथे ११ वर्षांच्या चिमुकलीचा लैंगिक छळ करून विनयभंग केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मोहाडी नगर पोलिस ठाण्यात एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.१५ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास नरव्हाळ येथील फिर्यादी महिला शेतात कामासाठी गेली होती. दरम्यान, तिचा लहान मुलगा संशयीत आरोपींच्या घरी खेळत होता. तेव्हा फिर्यादीची ११ वर्षे ९ महिने वयाची मुलगी ही लहान भावाला घेण्यास गेली असता संशयीत आरोपीने बालिकेचा लैंगिक छळ करून तिच्यासमोर अश्लील वर्तन केले. या घटनेनंतर बालिकेच्या आईने मोहाडी नगर पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद नोंदवली. त्यावरून संशयित बाळू महादु वाघ, इंदुबाई बाळू वाघ आणि वैशाली सोमनाथ वाघ (सर्व रा. पाण्याच्या टाकीजवळ, नरव्हाळ, ता.धुळे) यांच्याविरोधात बीएनएस कलम ७५(२), ७९, ३५२, ३(५) सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) कलम १२ व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी उपासे हे करत आहेत.

# बुराई नदीपात्रातील उपोषण अखेर लेखी आश्वासनानंतर मागे

## अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी दिवसरात्र पथक नियुक्त



**शिंदखेडा । प्रतिनिधी ।** तालुक्यातील बुराई नदीपात्रातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक रोखण्याच्या मागणीसाठी १३ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या बुराई नदी वाचवा आंदोलनाला अखेर यश आले आहे. प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर उपोषणकर्ते महेंद्रसिंग गिरासे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले. प्रसंगी तहसीलदार नितीनकुमार देवरे यासंह डी.एस.गिरासे यांच्या हस्ते लिंबुपाणी देऊन उपोषणाची सांगता झाली.

प्रसंगी मंडळ अधिकारी मनोज गोसावी, भूपेंद्रसिंग राजपूत, पत्रकार संघांचे अध्यक्ष भुषण पवार आदींची उपस्थिती होती. नदीच्या संरक्षणासाठी उभारलेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाकडून उपाययोजनांचे आश्वासन देण्यात आले असून, आता त्याच्या अंमलबजावणीकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. बुराई नदीचे संरक्षण व संवर्धन व्हावे, नदीपात्रातील अवैध उत्खननाला आळा बसावा आणि परिसरातील नैसर्गिक जलस्रोतांचे रक्षण व्हावे, या प्रमुख मागण्यांसाठी अलाणे येथील बुराई नदीपात्रात महेंद्रसिंग गिरासे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.

या आंदोलनाला अलाणे, चिरणे, कदाणे आणि बुराई नदी परिसरातील ग्रामस्थ, महिला भगिनी, पत्रकार संघटना, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध राजकीय संघटनांनी पाठिंबा दिला.तहसीलदार शिंदखेडा यांच्याकडून १५ ऑक्टोबर रोजी लेखी पत्र देण्यात आले. या पत्रात बुराई नदीपात्रातील अवैध उत्खनन आणि वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी दिवसरात्र पथक नियुक्त करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामदक्षता समिती आणि गौण खनिज पथकाला सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

याशिवाय, तहसीलदार यांनी संबंधित प्रकरणात एमपीडीए तसेच मकोका कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई करण्याबाबत आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. बुराई नदीपात्रातील अवैध उत्खनन आणि वाहतुकीविरोधात प्रशासन आता कोणती ठोस पावले उचलते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर महेंद्रसिंग गिरासे यांनी आमरण उपोषण मागे घेतले. यावेळी त्यांनी आंदोलनाला पाठिंबा देणार्या सर्व ग्रामस्थांचे, महिला भगिनींचे, वपरिसरातील सर्व, पत्रकार, शिवसेना आणि बांधकाम कामगार सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले. तसेच अलाणे, चिरणे, कदाणे आणि बुराई नदी परिसरातील उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पुढे आलेल्या नागरिकांचेही त्यांनी विशेष आभार मानले.

HDFC BANK
We understand your world

**नोंदणीकृत कार्यालय:** एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई-४०० ०१३; आणि ज्याचे एक कार्यालय 'रिटेल पोर्टफोलियो मॅनेजमेंट' म्हणून खालील पत्त्यावर कार्यरत आहे: एचडीएफसी बँक लिमिटेड, १ ला मजला, I-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई - ४०००४२.

**लिलाव विक्री सूचना**

संबंधित कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या कर्ज खात्यांमध्ये तारण म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा/अलंकारांचा जाहीर लिलाव आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. हे दागिने अशा कर्जदारांनी तारण म्हणून ठेवले होते, ज्यांनी एचडीएफसी बँक लिमिटेड (''बँक'') कडून थकीत रक्कम भरण्याबाबत स्मरणपत्र पाठवूनही, अंमलात असलेल्या कर्ज करारांच्या अटींनुसार आपली देणी परत करण्यात कसूर केली आहे.
बँकेने यापूर्वी सूचना (नोटिसा ) जारी करून, संबंधित कर्ज खात्यांमधील संपूर्ण थकीत रक्कम परत करण्यासाठी कर्जदारांना सात (७) दिवसांची मुदत दिली होती. कर्जदार आपली खाती नियमित करण्यात अपयशी ठरल्यामुळे, बँकेने कर्ज करार आणि लागू कायद्यांतर्गत तारणधारक म्हणून प्राप्त अधिकारांचा वापर करून, हे तारण अंमलात आणण्याचा आणि थकीत रक्कम वसूल करण्यासाठी तारण म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची/अलंकारांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे.
हा लिलाव खाली नमूद केलेल्या शाखेत / शाखांमध्ये दुपारी ३.३० वाजल्यापासून पुढे आयोजित केला जाईल. जर कोणत्याही कारणामुळे, एखाद्या तारण म्हणून ठेवलेल्या वस्तूचा लिलाव नियोजित तारखेला आयोजित करता आला नाही किंवा पूर्ण होऊ शकला नाही, तर बँकेकडे कोणत्याही पुढील सूचनेशिवाय, लिलाव पुढे चालू ठेवण्याचा किंवा तो कोणत्याही त्यानंतरच्या तारखेला व वेळी पुनर्निर्धारित करण्याचा अधिकार राखीव असेल.

| अनु. क्र. | कर्ज क्र. | कर्जदाराचे नाव | कर्ज रक्कम (रुपयांमध्ये) | लिलावाचे ठिकाण (शाखा पत्ता) | लिलावाची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७६१२५६३५ | हुसेन झकीयुद्दीन चावडीवाला | ९७३०० | एचडीएफसी बँक लिमिटेड परदेशी पुरा, नगर परिषदेजवळ, नंदुरबार, नंदुरबार, महाराष्ट्र ४२५४१२ | २७-१०-२०२६ |

हा लिलाव काटेकोरपणे ''जसे आहे जेथे आहे,'' ''जसे आहे जे आहे'', आणि ''जे जे आहे ते'' या तत्वावर पार पाडला जाईल. तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची/अलंकारांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यमापन यांबाबत बँक कोणतीही स्पष्ट किंवा अप्रत्यक्ष हमी अथवा विधान करत नाही. संभाव्य बोलीदारांनी आपली बोली लावण्यापूर्वी, तारण ठेवलेल्या वस्तूंची स्थिती, शुद्धता, कॅरेट, वजन आणि मूल्यमापन यांची स्वतः तपासणी करून, त्याबाबत स्वतःची खात्री करून घेणे ही त्यांचीच संपूर्ण जबाबदारी असेल. लिलाव सुरू होण्यापूर्वी ४५ मिनिटे तपासणी करण्याची परवानगी दिली जाईल; ही तपासणी पूर्णपणे बोलीदारांच्या स्वतःच्या खर्चाने, जोखमीवर आणि स्वेच्छेने केली जाईल.
या लिलावात सहभागी होऊन, बोलीदारांनी तारण ठेवलेल्या वस्तूंची स्वतंत्रपणे तपासणी केली आहे आणि बँकेच्या कोणत्याही विधानांवर अवलंबून न राहता, त्याशी संबंधित सर्व जोखीम स्वीकारली आहे, असे मानले जाईल. विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, वस्तू परत घेणे, बदलून घेणे, रक्कम परत मिळवणे, नुकसानभरपाई किंवा विक्री रद्द करणे यांसारख्या कोणत्याही विनंत्यांचा विचार केला जाणार नाही.
सर्व बोली या बँकेने लागू नियामक निकषांनुसार निश्चित केलेल्या किमान राखीव किमतीच्या अधीन असतील. लिलावाचे मूल्य खालील दोन पर्यायांपैकी जी रक्कम कमी असेल, त्यावर आधारित असेल: (अ) मागील तीस (३०) दिवसांतील सोन्याचा सरासरी बंद भाव, किंवा (ब) इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लि. (आयबीजेए) द्वारे लिलावाच्या आदल्या दिवशी प्रकाशित केलेला सोन्याचा बंद भाव. राखीव किंमत अंतिम करण्याचा आणि आवश्यक वाटतील अशा कोणत्याही अतिरिक्त अटी लादण्याचा संपूर्ण अधिकार बँकेकडे राखीव असेल.
जर कोणत्याही कर्जदाराने लिलाव सुरू होण्यापूर्वी, कर्ज करारानुसार आपली संपूर्ण थकीत रक्कम परतफेड केली, तर त्या खात्याशी संबंधित तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकार, बँकेच्या स्वेच्छेनुसार आणि कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय, लिलावातून वगळले जाऊ शकतात.
हा लिलाव आणि त्यातून होणारी कोणतीही विक्री, बँकेने आपल्या संपूर्ण आणि निरंकुश अधिकाराचा वापर करून, वेळोवेळी लादलेल्या, सुधारित केलेल्या किंवा विहित केलेल्या कोणत्याही अतिरिक्त अटी व शर्तींच्या अधीन असेल.
कृपया नोंद घ्यावी की, बँकेच्या खाली स्वाक्षरी करणार्या अधिकृत अधिकार्याने लिलावाची कार्यवाही कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय आणि कोणतेही कारण न देता पुढे ढकलण्याचा, स्थगित करण्याचा, सुधारित करण्याचा, थांबवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार स्वतःकडे राखीव ठेवला आहे. तसेच, कोणत्याही बोलीचा (किंवा बोलींचा) पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकार करण्याचा किंवा ती नाकारण्याचा अधिकारही या अधिकृत अधिकायाकडे राखीव आहे; आणि असा कोणताही निर्णय सर्व सहभागींवर अंतिम व बंधनकारक असेल.

**दिनांक १७.१०.२०२६**
**ठिकाण : धुळे**

**सही/- अधिकृत अधिकारी,**
**एचडीएफसी बँक लिमिटेड**

# भारतीय सैन्यात नोकरीचे आमिष; गुन्हा दाखल पाच जणांची १६ लाखात फसवणूक

**धुळे । प्रतिनिधी ।**

भारतीय सैन्यात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून पाच जणांनी तब्बल १६ लाख ८५ हजार १४९ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी एकास अटक केली आहे. याबाबत अजय पांडव चौधरी (वय ४०, रा. भुवाकी, पो.पानखेडा, ता. साक्री) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्यासह नातेवाईकांच्या मुलांना भारतीय सैन्य दलातील महार रेजिमेंट, महू (मध्य प्रदेश) येथे सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष संशयितांनी दाखवले होते. संशयित आरोपी कैलास मगन देसाई (रा. इदगाव पाडा, ता. साक्री), राजू शंकर अहिरे (रा. वखारी, ता. देवळा, जि. नाशिक) आणि नाना शिवाजी बेंद्रे (रा. देवळा, ता. देवळा, जि. नाशिक) यांनी अजय चौधरी व त्यांच्या नातेवाईकांचा विश्वास संपादन केला. ५ एप्रिल ते ११ सप्टेंबर २०२५ या कालावधीत अजय चौधरी तसेच वसंत रघुनाथ मालुसरे, भारत यशवंत सूर्यवंशी, चतुर सत्यपाल मालुसरे आणि अर्जुन चौरे यांच्याकडून १६ लाख ८५ हजार १४९ रुपये उकळून नोकरी न देता फसवणूक केली.

## नशिबाची परीक्षा

शनिवार १७/१०/२०२६

*** मिलन डे ***

१२३ १५० ११४ **६-५** १४० २३० ७८०
सिंगल ६-४-७
जोड ६०-१५-२४-७३-५९

*** कल्याण बाजार ***

१२० ६७० ५८० **३-९** १२६ ४५० १४४
सिंगल ३-७-८
जोड ३१-०९-४७-८५-९२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २४-०८-२०२६ २९-०८-२०२६ | ६६८ ०७ ४४९ | ४७० १७ १७९ | २४७ ३३ ४९० | ५६८ ९२ ३४५ | २४७ ३२ ४८० | ४७० १३ ७८८ |
| ३१-०८-२०२६ ०५-०९-२०२६ | ६०० ६९ ३६० | १९० ०५ २४९ | ५७९ १८ ५६७ | ८९९ ६५ ६९० | २२३ ७० २४४ | १५० ६३ १४८ |
| ०७-०९-२०२६ १२-०९-२०२६ | ४५० ९६ ११४ | २५९ ७६ १६९ | ५८९ २७ १८८ | ५७९ १५ ११३ | ७८० ५९ २८९ | ५६० १५ २४९ |
| १४-०९-२०२६ १९-०९-२०२६ | २९९ ०० १३६ | ३४८ ५८ ८०० | १५९ ५० २३५ | ४४७ ५८ २३३ | ७०० ७३ २३८ | २६६ ४३ २४७ |
| २१-०९-२०२६ २६-०९-२०२६ | ६७९ २४ ४५५ | १६९ ६५ १४० | ४८९ ११ १४६ | २३५ ०५ १४० | १५६ २७ १३३ | २९० १६ ११४ |
| २८-०९-२०२६ ०३-१०-२०२६ | ५६० १७ ७०० | १४७ २२ ६७९ | ४७७ ८८ ३६९ | ३९९ १८ ५६७ | ३७८ ८४ ३४७ | २३४ ९८ ३५० |
| ०५-१०-२०२६ १०-१०-२०२६ | ६७८ १६ ४५७ | १६७ ४७ ११५ | ४५६ ५४ १३० | २५८ ५६ १५० | ४९० ३ | ३५९ ७८ ५६७ |
| १२-१०-२०२६ १७-१०-२०२६ | १५९ ५५ ६९० | १४३ ३४ २२० | २३४ ९१ ३३५ | ३९० २६ ४६६ | २२७ १ | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २४-०८-२०२६ २९-०८-२०२६ | १९० ०२ २३७ | १७० ८० २८० | ११२ ४९ ५७७ | ३९० २२ १३८ | १६८ ५८ १७० | १६८ ५० १४५ |
| ३१-०८-२०२६ ०५-०९-२०२६ | ५८८ १६ २६८ | २३६ ११ २९० | ५६० १४ २६६ | १८० ९० ००० | ४५५ ४६ २७७ | २४० ६५ ८८९ |
| ०७-०९-२०२६ १२-०९-२०२६ | १३९ ३२ ६६० | २३४ ९० ३८९ | २४० ६९ ३६० | ३४५ २० ४७९ | २३८ ३१ २३६ | २३० ५७ ३५९ |
| १४-०९-२०२६ १९-०९-२०२६ | ३३० ६३ ३५५ | ● | २२० ४१ १०० | ५७९ १३ २५६ | २८९ ९२ ४८० | ५८९ २३ ३४६ |
| २१-०९-२०२६ २६-०९-२०२६ | ३४५ ४५ १६८ | ४६८ ८६ ३४९ | ४०० ४४ ५९० | ६६८ ०१ ४७० | ४७० १८ ३६९ | ३७९ ९४ ७८९ |
| २८-०९-२०२६ ३-१०-२०२६ | ५६० ११ ४८९ | ४४४ २२ ६७९ | ७८९ ४५ २३० | ११३ ५२ १२९ | २३४ ९२ ६८८ | ३६० ९० ६६८ |
| ०५-१०-२०२६ १०-१०-२०२६ | २५७ ४९ ११७ | ४६८ ८९ १८० | ४५८ ७५ ८८९ | ११० २९ ४६९ | ३९० ५२ ६६० | २२८ २८ ४४० |
| १२-१०-२०२६ १७-१०-२०२६ | ११७ ९३ ३०० | २७० ९३ २३८ | २७८ ७३ ५८० | ५७० २८ २८८ | | |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २६० ८९ २३४ | २४९ ५० ५६९ | ४४० ८४ ५९० | १४६ १२ ३४५ | ४९० ३९ २७० | २४० ६१ २९० |
| ४६८ ८२ २४६ | ४७९ ०९ ४७८ | १२९ २६ २४० | ३६० ९१ २४५ | १६० ७५ ३५७ | २३४ ९१ ४७८ |
| २५० ७४ २३९ | १६८ ५८ १३४ | २५७ ४१ ४८९ | ३४६ ३२ २३७ | १७९ ७४ २५७ | ७८० ५४ १६७ |
| ३९० २२ ४८० | ● | १५९ ५६ ३६७ | २२६ ७७ २५० | ४७० १५ १४० | ४६८ ८० ४७९ |
| १९० ०६ १७८ | ५६८ ९७ १७९ | ७७८ २९ २३४ | २८० ०४ १३० | १२४ ७५ ७८० | १२५ ८५ २३० |
| २२८ २२ १३८ | ८९९ ६० २३५ | २४६ २१ ५७९ | ४७९ ०८ ४४० | १५९ ५७ ५६६ | ३९० २४ ५९० |
| १२७ ०८ २८८ | १२९ २५ २३० | ४९० ३७ ३४० | ३४७ ४१ ३९९ | ५८० ३४ ७७० | ४४७ ५३ ६८९ |
| ४४७ ५३ ६८९ | १५९ ५७ २५० | १७० ८९ ३७९ | २३८ ३० १४५ | | |

**शुक्रवार १६/१०/२०२६**
**कल्याण - २२७-१**
**मिलन डे - ४७०-१५-४४७**

**गुरुवार १५/१०/२०२६**
**मेन बाजार - ३४६-३८-३६९**
**मिलन ना. - २४७-३७-१६०**

## पांढरे डाग

२४ तासातच फरक सुरू. पांढरे डाग (कोड), त्वचारोग, गुप्तरोग व लैंगिक समस्यांवर शंभर टक्के गॅरेंटेड उपचार. सौरॉयसीस, मुहाँसे, काळे चट्टे, सर्व प्रकारचे त्वचारोग व गुप्तरोग, हस्तमैथुन, शिघ्रपतन, स्वप्नदोष, लिंग लहान, बारीक, तिरपे, चाळीशीनंतरच्या काम समस्या, शुगरमुळे येणारी नस कमजोरी, नपुंसकता व नसांच्या कमजोरीवर उपचार. वयाची अट नाही. आजच भेटा. कायमचा पत्ता-डॉ.प्रणव पटेल **(MBBS)**, रेल्वे स्टेशनसमोर, डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ, एच.पी.निरंजन पेट्रोल पंप, नाशिकरोड, नाशिक. मो. ९४२२२८३९३०. हजारो पेशंट बरे झालेत. इतर शाखा-नाशिक, भुसावळ, पुणे, मुंबई, जळगाव, धुळे. कुरिअरची सुविधा. (१६/०४/२०२७)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

## देशदूत 'CLASSIFIED'

**सूचना** वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

## पाहिजेत

हेअर कटिंग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहिजेत. न्हावी समाजाच्या गरीब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीकपासून ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यंत मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहण्यासाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क-९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९. (CM-396320/3/1/27)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752**(VM.17/01/27. CRINIV-2526JL/CRG00550)**

## दारु बंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसॲप डॉ.पालवे, ॲडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... * व्यसन पेंशंटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण:-*व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... *(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.**(VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)**

## १००% व्यसनमुक्ती

*गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क:9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगांव. **(VM.17/01/27.CRINIV-2526JL/CRG00550)**

## इंग्रजी शिकायचे?

DAMBELKARS SPOKEN ENGLISH CLASSES, Jr KG, बालवाडी पासुन ते सर्व वयापर्यंत प्रवेश सुरु,''एकदा फी भरली कि जीवन भर क्लासेस मोफत'',जळगांव, भुसावळ, धुळे, शिरपुर,मो.**9325562488** (VM 18 AUG 2026)

छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

## CHANGE OF NAME

I Saberabai Gulamabbas Shafik HEREBY DECLARE THAT I HAVE CHANGED MY NAME FROM SABERABAI GULAM ABBAS (Old Name) TO SABERABAI GULAMABBAS SHAFIK (Name)